# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र.सआजीद/ओडी/३२/अनुज्ञापन (अति.निर्मु.)/दि.१६.०६.२०२३

## जाहिर सुचना

**विषय** – अनधिकृत फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करण्याकरीता कंत्राटी कामगार अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) मार्फत पुरवठा करण्याबाबतची जाहिर सुचना.

सदर जाहिर सुचनेमार्फेत सर्व अशासकीय संस्थांना कळविण्यात येते की, जी/दक्षिण विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात असणाया इच्छुक धर्मदाय आयुक्त व बृहन्मुंबई महानगरपालिकेत नोंदणीकृत असलेल्या स्थानिक अशासकीय संस्था, मंजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकरी संस्था, औदयोगिक सेवा सहकारी संस्था या संस्थांकडून **माहे जून २०२३ ते नोव्हेंबर २०२३** या कालावधीकरीता अतिक्रमण निर्मुलन वाहनावर एकुण १५ कंत्राटी कामगार पुरविण्याकरीता मोहरबंद इच्छापत्र मागविण्यात येत आहेत.

सदर इच्छापत्राचा नमुना वरिष्ठ निरीक्षक अनुज्ञापन (अतिक्रमण निर्मुलन), बृहन्मुंबई महानगरपालिका जी/दक्षिण विभाग कार्यालय, रुम नं.१७, दुसरा मजला, ना.म.जोशी मार्ग, धनमिल नाका, लोअर परेल, मुंबई ४०००१३ येथे रुपये ३००० /- अधिक १८% वस्तु व सेवा कर असे एकूण रुपये ३५४०/- आकारून (ना-परतावा) रोख स्वरुपात चलन काढून **दि.१९.०६.२०२३ ते दि.२७.०६.२०२३** या दिवशी **सकाळी १०.३० ते दुपारी ०१.०० वाजेपर्यंत** विकत घेउु शकतात तसेच आवश्यक कागदपत्रांसहित सिलबंद अर्ज **दि.२७.०६.२०२३** पर्यंत दुपारी ०१.०० वाजेपर्यंत अनुज्ञापन खाते, जी/दक्षिण विभाग, दुसरा मजला येथे सिलबंद पेटीत टाकावे. नमुद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

लॉटरीची तारीख **दि.३०.०६.२०२३** रोजी **दुपारी ०३.०० वाजता** निश्चित करण्यात आलेली आहे.

सही/-

**सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण विभाग**